**राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास सादर केलेल्या अहवाल क्र.४८, ५० व ५१ मधील शिफारशींनुसार महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या यादींमध्ये नव्याने जाती समाविष्ट करणे व वगळणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग**
**आणि विशेष मागास प्रवर्ग कलयाण विभाग**
**शासन निर्णय क्र. सीबीसी-२०१९/प्र.क्र.७२/मावक**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०४ जून, २०१९

वाचा :- शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.२३५/मावक-५, दि.२५.०६.२००८

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्याच्या विमुक्त जाती/ भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील जातींच्या यादीमध्ये राज्य मागासवर्ग आयोगाच्या अहवालानुसार वाचा येथे नमूद दि.२५.०६.२००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये काही नवीन जातींचा अंतर्भाव करुन यादी अद्ययावत केलेली आहे.

२. राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांनी अहवाल क्र.४८, ५० व ५१ शासनास सादर करुन त्याद्वारे महाराष्ट्र राज्याच्या विमुक्त जाती/ भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील जातींच्या यादीमधील काही जाती वगळण्याची तर काही जातींचा नव्याने अंतर्भाव करण्याची शासनास शिफारस केली होती. आयोगाने केलेल्या सदर शिफारशी विचारात घेऊन त्याबाबत निर्णय घेण्यासाठी दि.०१.०३.२०१९ रोजी सहयाद्री अतिथीगृह, मलबार, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.२८.०९.२००० रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत झालेल्या चर्चेअंती मंत्रीमंडळ उपसमितीने दिलेली मान्यता विचारात घेऊन विमुक्त जाती/ भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील जातींच्या यादीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१. राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास सादर केलेल्या अहवाल क्र.४८, ५० व ५१ मधील शिफारशींनुसार विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या दि.२५.०६.२००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंतिम करण्यात आलेल्या जाती /तत्सम जातीच्या यादीत खालील प्रमाणे बदल करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. **महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाने अहवाल क्र**. ४८ मध्ये प्रकरण क्र.४/२००४, प्र.क्र.११५/ २००९, प्र.क्र..९/२०१३, प्र.क्र.१४/२०१३ आणि प्र.क्र.०९/२०११ अन्वये एकूण ०५ बाबींवर सखोल पडताळणीअंती शासनास अभिप्राय सादर केले आहेत. सदर प्रकरणांबाबतची वस्तुस्थिती व गुणवत्ता विचारात घेऊन मंत्रीमंडळ उप समितीने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे नमूद बाबनिहाय मुद्दयास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| प्र.क्र. | जातीचे नाव | आयोगाची शिफारस | शासनाचा निर्णय |
|---|---|---|---|
| ४/२००४ | हरदास | भटक्या जमाती-ब या प्रवर्गातील अ.क्र.६ वरील चित्रकथी या जातीसमोर "हरदास (मुस्लिम धर्मीय वगळून)" या तत्सम जातीचा समावेश करण्यात यावा. | आयोगाच्या शिफारशीनुसार भटक्या जमाती-ब या प्रवर्गातील अ.क्र.६ वरील चित्रकथी या जातीसमोर "हरदास (मुस्लिम धर्मीय वगळून)" या तत्सम जातीचा समावेश करण्यात येत आहे. |
| १४/२०१३ | भावसार | इतर मागासवर्ग अ.क्र. १७० वरील "भावसार" या जातीसमोर "भावसार शिंपी, भावसार क्षत्रिय, रंगारी, भावसार रंगारी, रंगारी भावसार, भावसार क्षत्रिय रंगारी, भावसार क्षत्रिय शिंपी, रँग्रेझ, रंग्रेज (भावसार, रंगारी)" अशी नोंद करावी. तसेच इ.मा.व. यादीतील अ.क्र.१३२ वरील "रंगारी", अ.क्र. १३३ वरील रँग्रेझ व अ.क्र.१३५ वरील रंग्रेज (भावसार, रंगारी)" या जातीची नोंद वगळण्यात यावी. | आयोगाच्या शिफारशीनुसार रंगारी, भावसार क्षत्रिय शिंपी, रँग्रेझ, रँग्रेज (भावसार, रंगारी) या जातींचा अंतर्भाव इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या यादीतील अ.क्र.१७० मध्ये नव्याने करण्यात येत असल्यामुळे इ.मा.व. यादीतील अ.क्र.१३२ वरील "रंगारी", अ.क्र. १३३ वरील रँग्रेझ व अ.क्र.१३५ वरील रंग्रेज (भावसार, रंगारी) या जातींची इमाव यादीतील अ.क्र.१३२, १३३ व अ.क्र.१३५ वर आजमितीस असलेली दुबार नोंद वगळण्यात येत आहे. |
| ९/२०११ | कुलवंतवाणी | इतर मागासवर्गाच्या यादीत अ.क्र. १९० वर "कुलवंत वाणी, कु.वाणी, वाणी (कुलवंत), कुलवंत-वाणी, कुणबी वाणी" अशी नोंद करण्यात यावी. | आयोगाच्या शिफारशींनुसार इतर मागासवर्गाच्या यादीत अ.क्र. १९० वर "कुलवंत वाणी, कु.वाणी, वाणी (कुलवंत), कुलवंत-वाणी, कुणबी वाणी" अशी नोंद करण्यात येत आहे. |

३. **महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाने अहवाल क्र**. ५० मध्ये प्रकरण क्र.८७/२००७, प्र.क्र.१२८/ २०१०, प्र.क्र.२५/२००५, प्र.क्र.०३/२०११ आणि प्र.क्र.०३/२०१३ आणि १६/२०१३ अन्वये एकूण ०६ बाबींवर सखोल पडताळणीअंती शासनास अभिप्राय सादर केले आहेत. सदर प्रकरणांबाबतची वस्तुस्थिती व गुणवत्ता विचारात घेऊन मंत्रीमंडळ उप समितीने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे नमूद बाबनिहाय मुद्दयास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| प्र.क्र. | जातीचे नाव | आयोगाची शिफारस | शासनाचा निर्णय |
|---|---|---|---|
| ८७/२००७ | खारवा | विशेष मागास प्रवर्गाच्या यादीतील अ.क्र. ४/१३ वरील "खारवा/ खारवी" या नोंदीऐवजी "खारवा", "खारवी" अशी जातीची नोंद दुरुस्त करण्यात यावी. | आयोगाच्या शिफारशीनुसार विशेष मागास प्रवर्गाच्या यादीतील अ.क्र. ४/१३ वरील "खारवा/ खारवी" या नोंदीऐवजी "खारवा", "खारवी" अशी दुरुस्ती करण्यात येत आहे. |
| २५/२००५ | घाँची | "घाँची" समाजाचा इतर मागासवर्गाच्या यादीमध्ये अ.क्र. १८१ वर तेलीची उपजात म्हणून समावेश करण्यात यावा. | आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गाच्या यादीमध्ये अ.क्र. १८१ वर तेलीची उपजात म्हणून "घाँची" समाजाचा समावेश करण्यात येत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ****०३/२०११** | **कानोडी/ कानडी** | **इतर मागासवर्गाच्या यादीत पुढील अनुक्रमांकांवर घेण्यात यावी.** | **आयोगाची शिफारस मान्य करण्यात येत आहे. इतर मागास प्रवर्गाच्या यादीत अ.क्र.३४५ नव्याने अंतर्भूत करुन त्यासमोर “कानोडी/ कानडी” या समूहाची नोंद करण्यात येत आहे.** |
| ०३/२०१३ | लिंगायत आंबी नावाडी | “लिंगायत आंबी” हे नावाडी जातीचे असल्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या भटक्या जमातीच्या यादीत अ.क्र.२५ भोई या जातीसमोरील तत्सम जात क्र.(१८) वर नमूद असलेल्या “नावाडी” जातीचे दाखले त्यांना देण्यात यावेत असे शुध्दीपत्रक निर्गमित करण्याची शिफारस शासनास करण्यात येत आहे. | आयोगाची शिफारस मान्य करण्यात येत आहे. |
| १६/२०१३ | बेलदार | भटक्या जमाती-ब मधील अ.क्र.२ वरील “बेलदार” या जातीसमोर तत्सम जात म्हणून “कुमावत” जातीचा समावेश करण्यात यावा. | आयोगाच्या शिफारशीनुसार भटक्या जमाती-ब मधील अ.क्र.२ वरील “बेलदार” या जातीसमोर तत्सम जात म्हणून “कुमावत” जातीचा समावेश करण्यात येत आहे. |

४. **महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाने अहवाल क्र.** ५१ मध्ये प्रकरण क्र.०२/२०१३ आणि प्र.क्र.११९/ २००९ अन्वये एकूण ०२ बाबींवर सखोल पडताळणीअंती शासनास अभिप्राय सादर केले आहेत. सदर प्रकरणांबाबतची वस्तुस्थिती व गुणवत्ता विचारात घेऊन मंत्रीमंडळ उप समितीने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे नमूद बाबनिहाय मुद्दयास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| प्र.क्र | जातीचे नाव | आयोगाची शिफारस | शासनाचा निर्णय |
|---|---|---|---|
| ०२/ २०१३ | कामाटी | कामाटी जातीस विमुक्त (अ) मधील अ.क्र.३ भामटाची तत्सम जात म्हणून ठेवणे उचित होईल.<br>इतर मागासवर्ग यादीतील क्र. ७४ वर नोंद असलेली कामाटी या जातीची नोंद वगळण्यात यावी. | आयोगाची शिफारस मान्य करण्यात येते. कामाटी या जातीची नोंद आहे. त्यामुळे विमुक्त जाती-अ मधील अ.क्र.३ मधील भामटा या जातीची तत्सम जात म्हणून अ.क्र.३ (क) येथे दर्शविलेली कामाटी जातीची नोंद कायम ठेवून इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या यादीतील अ.क्र.७४ वरील कामाटी या जातीची नोंद दुबार नोंद टाळण्यासाठी वगळण्यात येत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | भामटा व घंटीचोर | इतर मागासवर्गाच्या यादीत क्र.२२० वरील भामटा बाबतचा उल्लेख संदर्भ ग्रंथात आढळून येत नसल्याने इतर मागासवर्ग यादीतील क्र.२२० वरील घंटीचोरे व भाम्पटा या जातींना वगळण्यात यावे. | आयोगाची शिफारस मान्य करण्यात येत आहे विमुक्त जाती-अ प्रवर्गाच्या यादीतील अ.क्र.३ येथे भामटा ही जात नमूद आहे. या जातीची तत्सम जात म्हणून ३(ग) येथे घंटीचोर या जातीचा अंतर्भाव आहे. इतर मागास प्रवर्गाच्या यादीतील अ.क्र.२२० येथे भामटा किंवा घंटीचोरे या जातींचा अंतर्भाव आहे. त्यामुळे भामटा व घंटीचोरे या दोन्ही जाती विमुक्त जाती-अ तसेच इतर मागासवर्गामध्ये समाविष्ट आहेत. एका जातीची दोन प्रवर्गात दुबार नोंद ठेवणे उचित नसल्याने आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गाच्या यादीतील अ.क्र.२२० वरील भामटा किंवा घंटीचोरे या जाती वगळण्यात येत आहेत. |
| | भुते भोपे | इतर मागासवर्ग क्र. ९४ वरील मानभाव, महानुभाव भोपी, मानभाव भोपी आणि भटक्या जमाती ब क्र.४ वरील भुते भोपे या जाती पूर्णपणे वेगळया असल्याचे स्पष्ट होत असल्याने इमाव आणि भज-ब या दोन्ही प्रवर्गातील नोंदी आहेत तशा त्या त्या ठिकाणी ठेवण्यात याव्यात. | आयोगाची शिफारस मान्य करण्यात येत आहे |
| | अन्सारी | इतर मागासवर्गाच्या यादीतील क्र.५७ वरील जुलाहा, अन्सारी नोंद कायम ठेवावी व अ.क्र. १९१ वरील मोमीन नोंद कायम ठेऊन “अन्सारी ” ही नोंद वगळावी. | अन्सारी या जातीची नोंद इतर मागासवर्गाच्या यादीतील अ.क्र.५७ व अ.क्र.१९१ वर आहे. त्यामुळे अन्सारी जातीची दुबार नोंद झाल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे आयोगाची शिफारस मान्य करण्यात येत असून इतर मागासवर्गाच्या यादीतील अ.क्र. १९१ वरील मोमीन या जातीची नोंद कायम ठेऊन “अन्सारी ” या जातीची नोंद वगळण्यात येत आहे. |

५. सदर शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आलेले बदल हे शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होतील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०६०४१५५५१२८७२२ असा आहे .हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAVINDRA VASANTRAO GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=9dfb7aefbd9e82b129c324d567b46e1d853d93c38d6e222c868eac72ecd12784, ou=VJNT OBC AND SBC DEPT, o=GOVERNEMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA VASANTRAO GURAV
Date: 2019.06.04 16:02:35 +05'30'

**(रविंद्र गुरव)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल महोदयांचे सचिव.

२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अ.मु.स./प्र.स./सचिव.
३. मा.मंत्री व राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा.
५. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद.
६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.
७. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
८. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. मुख्य महानगर दंडाधिकारी
११. सर्व विभागीय आयुक्त,
१२. सर्व जिल्हा दंडाधिकारी,
१३. सर्व उप विभागीय अधिकारी (महसूल)
१४. तथा उप विभागीय दंडाधिकारी,
१५. सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१८. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ, नागपूर
१९. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ, नागपूर
२०. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ, औरंगाबाद
२१. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ, औरंगाबाद
२२. संचालक, समाज कल्याण/ विजाभज, महाराष्ट्र राज्य, पुणे
२३. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२४. संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२५. संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२६. संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक
२७. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
२८. सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे
२९. सर्व मंत्रालयीन विभागांचे अप्पर मुख्य सचिव /प्रधान सचिव/ सचिव.
त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना दयाव्यात.
३०. उपायुक्त तथा सदस्य, विभागीय जात पडताळणी समिती (सर्व जिल्हे)
३१. सदस्य सचिव, जिल्हास्तरीय जात पडताळणी समिती (सर्व जिल्हे)
३२. सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी/ सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी
३३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
३४. सर्व जिल्हा परिषदांचे समाजकल्याण अधिकारी
३५. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बृहन्मुंबई/ मुंबई उपनगरे
३६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
३७. निवड नस्ती.